# कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांना जयंतीनिमित्त विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमधील कर्मवीर पाटील यांच्या पुतळ्यास व विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये त्यांच्या प्रतिमेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. अभय जायभाये, भूगोल अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. डी. शिंदे आदी उपस्थित होते. सुरक्षित शारीरिक अंतर पाळून हा कार्यक्रम करण्यातआला.

# एका तासात मांडावे लागणार शिवाजी विद्यापीठाचे 'व्हिजन'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरु पदाच्या निवड प्रक्रियेअंतर्गत २५ उमेदवारांच्या मुलाखती शनिवारी (दि. २६) आणि रविवारी (दि. २७) होणार आहेत. या उमेदवारांना त्यांचे शिवाजी विद्यापीठाचे पुढील व्हिजन, विकासाचा आराखडा हा कुलगुरु शोध समितीसमोर एका तासामध्ये मांडाया लागणार आहे.

या कुलगुरु पदासाठी १६१ जणांनी अर्ज केले होते. या अर्जांची छाननी झाल्यानंतर कुलगुरु शोध समितीने मुलाखतीच्या पहिल्या फेरीसाठी २५ जणांची नावे निश्चित केली आहेत. या उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखती शनिवारी, रविवारी रोजी होणार आहेत. या २५ जणांना प्रत्येकी एक तासाचा वेळ देण्यात आला आहे. त्यामध्ये त्यांना विद्यापीठाचे व्हिजन, स्वत:ची वाटचाल, आदींबाबतचे सादरीकरण करावयाचे आहे. संबंधित उमेदवारांकडे त्यांची पदवी, पदव्युत्तर पदवीची प्रमाणपत्रे, नियुक्तीचे पत्र आणि कुलगुरु पदासाठी कसे पात्र आहात याबाबतची दोन पानांची माहिती, तीन व्यक्तींची संदर्भपत्रे, आदी कागदपत्रे या शोध समितीने मागितली आहेत. उमेदवारांनी ही कागदपत्रे ई-मेलद्वारे पाठविली आहेत.

# कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांना अभिवादन

**कोल्हापूर :** कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवारी त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमधील कर्मवीर पाटील यांच्या पुतळ्यास व विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या पोर्चमध्ये त्यांच्या प्रतिमेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. अभय जायभाये, भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. एस. डी. शिंदे आदी उपस्थित होते.